स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड

“स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ,नांदेडच्या सामाजिकशास्त्रे विदयाशाखांतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी पदवीच्या नियोजित संशोधनासाठी सादर करावयाचा आराखडा"

परभणी जिल्हयातील निवडक मंदिरे (प्राचीन कालखंड): एक ऐतिहासिक अभ्यास

संशोधक

नागेश सखारामपंत जोशी

एम.ए.इतिहास

मार्गदर्शक

डॉ. अरविंद सोनटक्के

सहायक प्राध्यापक,संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख

इतिहास विभाग

दिगंबरराव बिंदु कला,वाणिज्य व विज्ञान महाविदयालय,

भोकर जि. नांदेड

संशोधन केंद्र

इतिहास विभाग

नूतन महाविद्यालय,सेलू जि.परभणी

2021

परभणी जिल्हयातील निवडक मंदिरे(प्राचीन कालखंड): एक ऐतिहासिक अभ्यास

प्रस्तावना

मंदिर आणि मूर्तीपुजा भारतीय संस्कृतीची ठळक वैशिष्ट्ये असून महाराष्ट्रामध्ये अनेक ऐतिहासिक वारसा लाभलेली मंदिरे आपल्याला पाहावयास मिळतात. त्यातही मराठवाडाहा प्रदेश स्थापत्य, कला व शिल्पशास्त्रीयदृष्ट्या संपन्न असा प्रदेश होय. या ठिकाणी असलेली मंदिरे इतिहासाचा एक फार मोठा पुरातत्त्वीय पुरावा आहेत. या प्राचीन मंदिरांच्या निर्मितीचा कालावधी आठवे शतक तर ते चौदाव्या शतकापर्यतचा आहे. या काळात अनेक शिल्पसमृद्ध मंदिरे निर्माण होत गेली. परभणी जिल्हयातही अशी काही मंदिरे तत्कालीन कालखंडात निर्माण केली गेली आहेत, त्यांच्या निर्मितीमध्ये कलाकारांचे योगदान फार महत्वाचे ठरते. येथील सर्वात प्राचीन मंदिरे विटांची बांधलेली आहेत, नंतर मात्र मंदिरे पाषाणात घडवली गेली. लयन स्थापत्य,मंदिरे, बारव इत्यादी अनेक वास्तू निर्मितीचे शास्त्र भारतात प्राचीन काळापासून विकसित होत गेले.आदिम अवस्थेपासून जीवन जगतांना गुहा वृक्ष-वेली यांचा निवाऱ्यासाठी वापर करणाऱ्या मानवाने शास्त्रशुद्ध व आश्चर्यचकित करणारे स्थापत्य विकसित केले, हा त्यांच्या प्रगतीचा आलेख खरोखरच विलक्षण आहे.मानवी जीवनातील प्रगतीचा अभ्यास करताना भारतीय स्थापत्य,वास्तू ह्या अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.या सर्वात मंदिराचे स्थान महत्वपूर्ण आहे.

महाराष्ट्रासह मराठवाड्यात प्रामुख्याने उत्तर चालुक्य कालीन,हेमाडपंती शैलीची मंदिरे पहावयास मिळतात. मात्र बांधीव मंदिर म्हटले की आपल्याकडे 'हेमाडपंती' असा उल्लेख केला जातो. हेमाडपंती नाव देवळे बांधण्याच्या पद्धतीवरून पडलेले आहे. यादव राजांकडे प्रधान म्हणून कार्य करताना त्यांनी अनेक मंदिरे उभारली.तसेच जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला.शुष्कसांधी पद्धतीने दगडावर दगड ठेवून हे बांधकाम केले जाई.परभणी जिल्हयात अशा प्रकारची अनेक मंदिरे असल्याची आपल्याला दिसून येतात. यापैकी माझ्या संशोधनाचा विषय "परभणी जिल्हयातील निवडक मंदिरे(प्राचीन कालखंड): एक ऐतिहासिक अभ्यास" हा आहे.

महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील स्थापत्य व मूर्तीविज्ञानाचा अभ्यास करणारयांमध्ये जेम्स बर्जेस, हेन्री कझिन्स,ए.व्ही.नाईक,जेम्सफर्ग्युसन,ग.ह.खरे,एस.बी.देव, गो.ब.देगलूरकर, प्रभाकर देव,एस.बी.देशमुख,अशोक आहेर,ए.डी.शिंदे,डी.एन.जगदाळे, एस.बी.नानवटे,शितल कदम ई.समावेश होतो. त्यांनी या संदर्भात मंदिर स्थापत्य व मूर्ती शिल्पाचा अभ्यास केला आहे. मात्र यावर अजूनही नव्याने अभ्यास होणे गरजेचे आहे.

मंदिरे ही केवळ धार्मिक अधिष्ठानापुरती मर्यादित नाहीत तर स्थापत्याचा मूळ गाभा या मंदिराद्वारे आजही टिकून आहे. असंख्य परकीय आक्रमणे, त्यातून होणारा विध्वंस व राजकीय अधिकार प्राप्त करण्याच्या हव्यासापोटी असंख्य प्रासाद,मंदिरे,वास्तू यांची हानी झाली तर दुसऱ्या बाजूस भारतीय स्थापत्यशैली व परकीय स्थापत्यशैलीचा प्रभाव पडल्याचे आपल्याला दिसून येते. परंतु अध्यात्माचा देह आणि देऊळ यांच्याशी संबंध जोडला गेला आणि मंदिराला मनुष्यदेहाप्रमाने कल्पून त्याच्या विविध भागांना मानवी अवयवांच्या जागी कल्पून मांडणी केल्याचे दिसून येते.

काळानुसार मंदिराच्या अनेक शैली विकसित होत गेल्या,परकीय आक्रमकांद्वारे धार्मिक द्वेषापोटी बऱ्याचदा मंदिराचा विध्वंसही केला गेला. तरी याही कालखंडात मंदिराचे स्वतंत्र अस्तित्व जपण्याचे कार्य केल्याचे आपणास दिसून येते. परभणी जिल्ह्यातही प्राचीन कालखंडातील मंदिरे व वास्तू वारा,पाऊस यांना झेलत आजही डौलाने उभ्या आहेत,तर काही दुर्लक्षित असून नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. मंदिराच्या बाह्यांगावरसुद्धा शिल्पसमृद्धता आढळते. यात विविध मूर्ती आपल्याला आढळून येतात. यांचाही अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात येणार आहे.

समस्या सूत्रण

इतिहासाच्या संशोधनामध्ये पुरातत्वीय साधने मोलाची भूमिका बजावतात, प्राचीन वास्तू ह्या एक महत्त्वाचा पुरावा आहे. या वास्तू इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वपूर्ण पुरावा म्हणून कार्य करतात. मंदिराच्या निर्मितीबरोबरच मंदिरात केवळ अध्यात्मिक शिक्षण मिळत होते.अध्यात्मिक शिक्षण तत्कालीन समाजाला मिळत होते का? स्थापत्याच्या दृष्टिकोनातून तत्कालीन स्थापत्यशास्त्रातील प्रगती लक्षात येते का? या साऱ्या बाबी अभ्यासणे आवश्यक आहे.परभणी जिल्ह्यात अनेक वैशिष्ट्यपूर्ण अशी कलाकृतीने नटलेली मंदिरे असून याकडे पर्यटक ऐतिहासिक दृष्टिकोनातून आकर्षित का होत नाहीत?होतात का? हा शोध घेणे आवश्यक ठरते.मंदिरातील अनेक मूर्तीशिल्पे भग्नावस्थेत दुर्लक्षित राहतात. त्यामुळे या मंदिरांचा सखोल अभ्यास करून याबाबत जाणीव जागृती करून त्यांची जतन व संवर्धन कसे करता येईल याचाही विचार आवश्यक आहे.

विषय निवडीचा उद्देश.

वैभवशाली व समृद्ध अशा भारताचा प्राचीन काळापासून इतिहास सांगणाऱ्या अनेक वास्तू आजही अस्तित्वात असून त्या डौलाने उभ्या आहेत यापैकी काही कालौघात नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.वास्तूंचे मंदिरांचे जतन,संवर्धन व्हावे याबाबत जाणीव जागृती निर्माण व्हावी,सर्वसामान्य जनतेला हे पटवून देणे गरजेचे आहे.परभणी जिल्ह्यातही विविधता असलेली शिल्पसमृद्ध अशी मंदिरे असून यावर आजवर काही अभ्यासकांनी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.परंतु त्यावर सखोल संशोधन होणे गरजेचे आहे. पूर्वजांनी निर्माण केलेला हा प्राचीन ठेवा मंदिरे ही फक्त ईश्वर पूजेसाठी नव्हती तर त्यातून समाजजीवन घडविण्यास अनुकूल असलेल्या अनेक कलांचे व कलाकारांची ती आश्रयस्थाने होती. मंदिरांच्या शिल्पस्थापत्याचा सखोल

अभ्यास सर्वागाने होणे गरजेचे आहे. अभ्यासक व सर्वसामान्यांना या मंदिरातील व मंदिरावरील वैशिष्ट्यपूर्ण शिल्प स्थापत्याविषयी माहिती व्हावी म्हणून "परभणी जिल्ह्यातील निवडक मंदिरे(प्राचीन कालखंड): एक ऐतिहासिक अभ्यास" हा विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे. मंदिर स्थापत्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन केवळ अध्यात्मापुरता मर्यादित न राहता एक समृद्ध ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा म्हणून त्याचे जतन,संवर्धन व अभ्यास होणे गरजेचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे.

1) परभणी जिल्ह्यातील मंदिरे आणि मूर्ती शिल्पांचा अभ्यास करणे.

2) मंदिर व मूर्तीशिल्पाचे जतन आणि संवर्धन होत आहे का ते अभ्यासणे.

3) तत्कालीन मंदिर स्थापत्याचा अभ्यास करणे.

4) तत्कालीन वास्तुशास्त्र व शिल्पशास्त्राची माहिती घेणे.

5)मंदिर वास्तू बाबत जनलोकात साक्षरता,जाणीव आणि जागृती निर्माण करणे.

संशोधनाची मर्यादा व व्याप्ती

प्रस्तुत प्रबंधात संशोधकाने "परभणी जिल्ह्यातील निवडक मंदिरे(प्राचीन कालखंड): एक ऐतिहासिक अभ्यास" या विषयावर संशोधन कार्य करायचे आहे.वेळ,श्रम,पैसा,वैयक्तिक मर्यादा लक्षात घेऊन शक्य तितक्या प्राचीन निवडक मंदिरांची निवड केली आहे. परभणी जिल्ह्यातील निवडक मंदिरांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

उत्तर चालुक्यकालीन मंदिरे, यादवकालीन मंदिरे व त्यावरील शिल्पांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

शिल्पकार आणि शिल्पी यांना तत्कालीन कालखंडात राजाश्रय प्राप्त झाला होता राजकीय आणि आर्थिक शक्तीच्या पाठबळावरच स्थपती व शिल्पींच्या परिश्रमातून परभणी जिल्ह्यामध्ये अनेक मंदिरे निर्माण झाली या मंदिरांच्या स्थापत्यावर विविध शैलीचा प्रभाव जाणवतो त्यांचा अभ्यास करणे, मंदिराच्या बाह्यांगावरील शिल्पांचा अभ्यास करणे, त्यांचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून मूल्यमापन करणे गरजेचे आहे.आपला प्राचीन अनमोल वारसा सर्वांना माहिती व्हावा या दृष्टीने संशोधन कार्य करण्यात येईल.

गृहीतके

1) जिल्ह्यातील प्राचीन मंदिराच्या निर्मितीमध्ये कल्याणीच्या चालुक्यांचे योगदान आहे.

2) मंदिर स्थापत्याच्या निर्मितीसाठी राजकीय सत्तांचे पाठबळ होते.

3)तत्कालीन वास्तूशास्त्र व शिल्पशास्त्र प्रगत होते.

4) प्राचीन मंदिरावर अनेक शैलीचा प्रभाव दिसून येतो.

5) तत्कालीन मंदिर स्थापत्याचा उपयोग आजही नवीन मंदिरे निर्माण करतांना होत आहे.

संशोधन पद्धती

या शोध प्रबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती वापरण्यात येणार असून यात प्रामुख्याने सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धती आणि निरीक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.तसेच प्राथमिक व दुय्यम संदर्भ ग्रंथाचा आधार घेण्यात येणार आहे.

संशोधनाची साधने.

प्राथमिक साधने

अग्निपुराण,देवीभागवत,प्रसादमंडन,काश्यपशिल्प,समरांगनसूत्रधार,मयमतम्,क्षीरार्णव,शिल्पप्रकाश, मानसार,अपराजितपृच्छा इत्यादी मूळ साहित्यचा आधार प्रामुख्याने संशोधनासाठी घेतला जाणार आहे.

दुय्यम साधने.

मूर्तीविज्ञान,भारतीय मूर्तीशास्त्र,दि एलेमेंट्स ऑफ हिंदू आयकानोग्राफी यांचा अभ्यास करून स्थापत्य व शिल्पांची सविस्तर माहिती घेण्यात येणार आहे.

इतर साधने

गॅझेटिअर,जर्नल्स,वार्षिके, नियतकालिके,स्मरणिका आदींचा वापर करण्यात येईल.

प्रत्यक्ष क्षेत्र भेट (सर्वेक्षण)

परभणी जिल्ह्यातील परिसरात असणाऱ्या मंदिरांना प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण करण्यात येणार आहे.या निरीक्षणाच्या आधारावर या ठिकाणाच्या मूर्ती तसेच अन्यत्र उपलब्ध असणाऱ्या मूर्ती यांची तौलनिक माहिती अभ्यासासाठी घेतली जाणार आहे.

संशोधन आराखडा

प्रस्तुत शोधनिबंधाची एकूण पाच प्रकरणात मांडणी करण्यात आलेली असून ती खालील प्रमाणे आहे.

प्रस्तावना व विषयप्रवेश.

प्रकरण पहिले परभणी जिल्ह्याची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

प्राचीन ग्रंथातील उल्लेखानुसार 'परभणी' हा भाग विदर्भात समाविष्ट होता.या जिल्ह्याला रामायण महाभारतापासून इतिहासाचा वारसा आहे, हे सिध्द होते.मुदगल,पाथरी,गंगाखेड,जैनपूर (जिंतूर) इत्यादी ठिकाणे सम्राट अशोकाच्या साम्राज्यामध्ये समाविष्ट होती. परभणीचा समावेश सम्राट अशोकाच्या साम्राज्यामध्ये होता. सातवाहन कालखंडामध्ये येथील सांस्कृतिक व आर्थिक जीवन समृद्ध होते. तथापि थोड्याच कालावधीनंतर वाकाटकांनी या परिसरात आपली सत्ता स्थापन केली. नंतर चालुक्य कालखंडामध्ये मूर्तिपूजा व मंदिरपूजा फार मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाल्या. या काळात उत्कृष्ट मंदिरे व शिल्पकलेचा उदय झाला. यादव काळामध्ये या परिसरात अनेक प्रसिद्ध हेमाडपंती मंदिरे बांधली गेली. यादवांच्या काळात हेमाद्री उर्फ हेमाडपंत हा विद्वान,कलाप्रेमी व वास्तुविशारद होता.त्याने 'चतुर्वर्ग चिंतामणी' हा ग्रंथ लिहिला व परिसरात अनेक मंदिरांची दुरुस्ती व नव्याने बांधणी केली. हेमांडपंती देवालये ही परभणीच्या संस्कृतीचे एक लेणे होय.

परभणी जिल्ह्याचा भाग हा बहामणी,इमादशाही,अहमदनगरची निजामशाही व मोगल यांच्या अधिपत्याखाली बरीच वर्षे राहिल्यानंतर इ.स. 1713 मध्ये निजाम साम्राज्याचा भाग बनला. परभणीला पूर्वी

'प्रभावतीनगर' असे म्हटले जात होते. स्वातंत्र्यानंतर 1956 मध्ये मराठवाडा हा मुंबई प्रांतात सामील झाला. 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सध्याच्या महाराष्ट्र राज्याचा एक भाग आहे. परभणी जिल्ह्याचे 1 मे 1999 रोजी विभाजन होऊन हिंगोली जिल्ह्याची निर्मिती झाली. मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यापैकी हा एक महत्त्वपूर्ण जिल्हा आहे. परभणी जिल्ह्याच्या उत्तरेस हिंगोली जिल्हा आहे. जिल्ह्याच्या पूर्वेस नांदेड, दक्षिणेला लातूर आणि पश्चिमेला बीड व जालना हे जिल्हे आहेत. परभणी जिल्ह्याचे मुख्यालय आहे. जिल्ह्यात एकूण 9 तालुके आहेत. परभणी, सेलू, जिंतूर, गंगाखेड, पूर्णा, पालम, पाथरी, मानवत, सोनपेठ.

परभणी जिल्ह्यात अजिंठा पर्वताची एक रांग जिंतूर तालुक्यातून जाते. या रांगेमुळे जिल्ह्याच्या उत्तरेकडे पठार तयार झालेले आहे. जिल्ह्याच्या दक्षिणेकडे बालाघाट पर्वतरांगा पसरलेल्या आहेत. गोदावरी ही प्रमुख नदी असून दूधना व पूर्णा या गोदावरीच्या उपनद्या आहेत. आजच्या स्थितीत प्रशासकीयदृष्ट्या सोयीसाठी मराठवाडा या विभागात परभणी जिल्ह्याचा समावेश होतो. वरील सर्व घटकांचा अभ्यास या प्रकरणात सविस्तरपणे करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे मंदिर स्थापत्य आणि शैली

मंदिर म्हणजे काय? मंदिर स्थापत्याचा उगम कसा झाला? भारतातील,महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील मंदिरे कोणत्या काळात व कशी विकसित झाली? मंदिर स्थापत्य होत गेलेले बदल, मंदिराच्या नागर, द्राविड व वेसर शैली ह्या कश्या प्रकारे विकसित होत गेल्या,या सर्व बाबींचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

मंदिराच्या निर्मितीपूर्वी मूर्तीपूजेचा उगम झाल्याचे आपल्याला दिसते. अश्मयुगापासून आपल्याला मूर्तीपूजेचे पुरावे सापडतात. अश्मयुगातील मानव निसर्गातील अनाकलनीय गोष्टीतून धर्माकडे वळला. कालौघामध्ये मूर्तीपूजेचे महत्त्व वाढतच गेले. स्वतःच्या निवासाप्रमाणे मानवाने देवतांचे निवास बांधायला सुरुवात केली. परंतु नंतर देवाचे अस्तित्व मानवापेक्षा भिन्न व व्यापक आहे. हे लक्षात आल्यावर मात्र त्याने देवतेची निवासस्थाने भव्यदिव्य बांधायला सुरुवात केली. याचा पुरावा विदिशा येथे प्राप्त झाला असून येथे मंदिराची प्रारंभिक अवस्था आपल्याला आढळते. मंदिराचे छत घराप्रमाणे सपाट आढळते. मौर्य काळातही मूर्तिपूजा प्रचलित होती. पुढे गुप्त-कुषाण कालखंडात मंदिराचे स्थापत्य बदलले.

6व्या शतकापासून ते 12 व्या शतकापर्यंत मंदिर स्थापत्य शैली मध्ये बदल होत गेले. महाराष्ट्रासह मराठवाड्यात ही स्थानिक वैशिष्ट्ये जपत मंदिराचा उगम व विकास होत गेला. मंदिर स्थापत्याची ही कला व परंपरा जोपासण्याचे काम राजसत्तेवर असलेल्या सम्राटांनी केले.

प्रकरण तिसरे- परभणी जिल्हयातील मंदिरे

परभणी जिल्हयाला संतांची भूमी म्हणून ओळखले जाते. परभणी जिल्हयांमध्ये आपल्याला हेमांडपंती शैलीची मंदिरे पहावयास मिळतात. सातवाहन राजवटीपासून ते निजामापर्यंत अनेक राजसतांनी याठिकाणी अंमल प्रस्थापित केला. आजच्या परभणी जिल्हयामध्ये एकूण 9 तालुके असून जवळपास प्रत्येक तालुक्यामध्ये मंदिर स्थापत्य निरनिराळ्या कालखंडातील आपल्याला पहावयास मिळते. यात प्रामुख्याने(उत्तर चालुक्यकालीन मंदिरे, यादवकालीन मंदीरे,उत्तर यादवकालीन मंदिरे) यांचा समावेश आपल्याला करता येईल. तत्कालीन कालखंडातील वास्तुकला स्थपती,शिल्पी यांना मिळालेला राजाश्रय यातून निर्माण झालेली कलाकृती या साऱ्याचा सुरेख मिलाप आपल्याला येथील मंदिर स्थापत्य अभ्यासात आढळून येतो. सातवाहन काळापासून ते यादवापर्यंत राजकीय सत्ता प्रस्थापित केलेल्या सत्तांनी या परिसराला कला व स्थापत्याच्या दृष्टीने समृद्ध व संपन्न केले आहे.

परभणी जिल्हयातील मंदिरांचे स्थापत्य,रचना,शिलालेख,मंदिरे या साऱ्या बाबींचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे- मंदिराच्या बाहयंगावरील मूर्तीशिल्प

प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून ज्या मंदिरांचा अभ्यास केला जाणार आहे. त्या मंदिर परिसरात आढळून येणाऱ्या विविध देवदेवता शिल्पे,शिव,विष्णु,देवी प्रतिमा,मिथुन शिल्पे,सुरसुंदरी प्रतिमा, गणेश प्रतिमा इत्यादी मूर्तीशिल्पांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रारंभीच्या बांधीव मंदिर स्थापत्यात शिल्पविष्काराला आणि मूर्तीच्या अभिव्यक्तीला विशेष स्थान नव्हते. आधीच्या काळातील मंदिरांना शिल्पकलेची जोड सजावट नव्हती. मंदिरस्थापत्याची प्रगती होत असतानाच मूर्तीविज्ञानही विकसित होत होते. त्यामुळे देव-देवतांच्या मूर्तीची मूर्तीना मंदिराच्या स्थापत्यात महत्त्वाचे स्थान मिळाले. स्थपती अशा मूर्तींना मुद्दाम तयार केलेल्या देवकोष्टकांमध्ये स्थान देऊ लागले.हळूहळू स्तंभ,मंदिराचे बाहयांग,अंतरंग याठिकाणी देव-देवतेच्या,उपदेवतांच्या मूर्ती विराजमान झाल्या. दैवत परंपरेतील सर्व मूर्तींना शिल्पकारांनी मंदिराच्या बाहय भिंतीवर आविष्कारीत केलेले दिसून येते. सुरसुंदरी किंवा अप्सरांचे स्थान स्त्री शिल्पात अनन्यसाधारण आहे.शिल्पप्रकाश,क्षीरार्णव या ग्रंथात त्यांची वर्णने व मंदिराच्या बाहयांगावर शिल्पांकन करण्याचे प्रयोजन सांगितले आहेत.

धारासुर येथील गुप्तेश्वर मंदिर,जांब येथील मंदिर यांच्या बाह्यांगावर अनेक सुरसुंदरी प्रतिमा कोरलेल्या आहेत. साधारणता या मूर्ती मंदिराच्या बाह्यांगावरच असतात, परंतु ढेंगळी पिंपळगाव येथील महादेव मंदिरात त्या वितानावर शिल्पांकित केलेल्या दिसून येतात.

मूर्ती बनविण्याचे एक शास्त्र असून शिल्पीच्या परंपरेमध्ये हे शास्त्र अवगत करून प्रमाणबद्ध मूर्ती घडविल्या जात. मंदिर व मूर्ती यांचे अतूट नाते आहे. स्थपतींनी शिल्पीनी केलेल्या शिल्पाविष्कारातील अद्वितीय कलाकृतीतून मंदिरे विकसित झाली.

या शोधप्रबंधातील प्रस्तुत प्रकरणातून मंदिराच्या बाह्यंगावर आढळणाऱ्या मूर्ती शिल्पांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे उपसंहार.

या प्रकरणात संशोधन आणि अभ्यासातून निघालेले निष्कर्ष दिले जाणार आहेत. प्रस्तुत संशोधन आराखडा स्थूल स्वरुपाचा असून संशोधनादरम्यान त्यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

समारोप

"परभणी जिल्ह्यातील निवडक मंदिरांचा अभ्यास (प्राचीन कालखंड):एक ऐतिहासिक अभ्यास "या विषयावर संशोधन कार्य करायचे आहे. प्रस्तुत संशोधन आराखडा स्थूल स्वरूपाचा असून संशोधनादरम्यान त्यामध्ये गरजेनुसार, संशोधन मार्गदर्शकांच्या सूचनेनुसार योग्य ते बदल केले जातील.संशोधन कार्यात वापरल्या जाणाऱ्या साधनांचा उल्लेख केला जाईल. संदर्भांची योग्य नोंद घेतली जाईल.आवश्यकतेनुसार टिपा,तळटीपा, परिशिष्ट जोडण्यात येतील. प्रबंधाच्या शेवटी संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भ साधनांची सूची देण्यात येईल.

संदर्भ ग्रंथ.

1) कुलकर्णी र. पु. काश्यशिल्प, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, 1987

2) कुलकर्णी र.पु.. शिल्पप्रकाश, महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 2000.

3) खरे ग.ह. मूर्तीविज्ञान, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, 1939.

4) जोशी नि.पु., भारतीय मूर्तिशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ मंडळ,नागपूर, 1979.

5) जोशी महादेवशास्त्री, भारतीय मूर्तिकला, अनमोल प्रकाशन, पुणे, 1980.

6) देगलूरकर गो.ब. शिवमुर्तेये नमः, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2008.

7) मोरवंचीकर रा. श्री. सातवाहनकालीन महाराष्ट्र, अपरांत प्रकाशन पुणे, 2017.

8) डॉ. प्रभाकर देव, मराठवाड्यातील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पाविष्कार,अपरांत प्रकाशन, पुणे, 2017.

9) देगलूरकर गो.ब., सुरसुंदरी, भारतीय विद्या भवन, पुणे 2004.

10) देशमुख किरण, मराठवाड्यातील देवतांची रूपे, निर्मल प्रकाशन, नांदेड, 2017.

11) गद्रे प्रभाकर,मंदिर स्थापत्याचा इतिहास,मंगेश प्रकाशन,नागपूर ,2010.

12) राव टी. एन. गोपीनाथ, १९१६, दि एलेमेंट्स ऑफ हिंदू आयकानोग्राफी, खंड १ व २,मद्रास.

13) अ.श.पाठक,मराठवाडा एक शोध

14) उदयन इंदूरकर,प्राचीन मंदिरे,मूर्ती आणि भावपूर्ण शिल्पे,भारतीय विचार साधना पुणे प्रकाशन,2019

गॅझेटियर

1) परभणी,जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन,मुंबई,

2) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर इतिहास प्राचीन काळ,(खंड1) सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई, 2010.

संशोधन पत्रिका

इतिहास संशोधन पत्रिका (मराठवाडा परिषद)अंक एकोणिसावा.औरंगाबाद, 2015.

मार्गदर्शक.

डॉ. अरविंद सोनटक्के

सहायक प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक.

व विभाग प्रमुख,इतिहास विभाग

दिगंबरराव बिंदु कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय,

भोकर जि. नांदेड

संशोधक

नागेश सखारामपंत जोशी

परभणी,(महाराष्ट्र)